**श्री.उदय डांबे, विद्युत निरीक्षक यांच्या निलंबनाबाबत..**

# महाराष्ट्र शासन

**उद्योग,ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**

**शासन आदेश क्रमांकः- मुविनि-२०२६/प्र.क्र.५५/ऊर्जा-१ (ई-१६३६४३९)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
तिसरा मजला,मंत्रालय मुख्य इमारत,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांकः- ०८ मे, २०२६

**वाचा:-** १) शासन आदेश क्र.मुविनि-२०२५/प्र.क्र.१४८/ऊर्जा-१, दि.०७.०१.२०२६.
२) खराडी,पुणे येथील आय.टी.पार्क मधील उद्वाहन उभारणीमध्ये झालेल्या गैरकारभाराबाबतचा चौकशी अहवाल, दि.२८.०२.२०२६.

**आदेश:-**

ज्याअर्थी, श्री.उदय डांबे, विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग, जळगाव यांनी तत्कालीन विद्युत निरीक्षक, उद्वाहन, मुंबई या कार्यालयात दि.३१.०३.२०२१ ते दि.३०.०७.२०२५ या कालावधीत विद्युत निरीक्षक,उद्वाहन या पदावर कार्यरत असतांना मे.पंचशिल बिझनेस हब, पुणे खराडी स.नं.४०, हिस्सा नं.१ बी/१+२बी/१+बी/१ भाग, पुणे येथील प्रस्तावित आय.टी.टॉवर इमारतीमध्ये उभारण्यात येणाऱ्या १८ उद्वाहनांचे प्रत्यक्षपणे निरीक्षण न करता व तपासणीसूचीनुसार सर्व बाबींची पुर्तता न करता उद्वाहन उभारणी व देखभाल परवाना आणि उद्वाहन चालवण्याची अनुज्ञप्ती नियमबाह्य पद्धतीने दिली आहे. तसेच एकूण १८ पैकी १० उद्वाहनांची उभारणी केलेली नसतांनादेखील, सदर उद्वाहनांची उभारणी झाली असल्याचा अहवाल देऊन उद्वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती नियमबाह्य पध्दतीने निर्गमित केलेली आहे.

**०२.** ज्याअर्थी, श्री.उदय डांबे यांनी त्यांच्याअंतर्गत एकूण १० सहाय्यक विद्युत निरीक्षक कार्यरत असतांनासुद्धा दि.१९.०३.२०२५ ते दि.२७.०४.२०२५ या कालावधीत निर्गमित करण्यात आलेल्या ३३७० उद्वाहन अनुज्ञप्तीपैकी १५८६ म्हणजे ४७% उद्वाहनांची निरीक्षणे स्वतःच केल्याचे तसेच, त्यांच्या १२४ उद्वाहनांच्या निरीक्षण अहवालात निरीक्षण दिनांक लिहिलेले नसल्याचे व एकेका दिवशी २६, ३५, ५०, ६०, ६७, ८२ उद्वाहनांची निरीक्षणे केल्याचे दिसून येते, जे मानवी क्षमतेच्या दृष्टीने शक्य नाही. उद्वाहन हे जनतेच्या सुरक्षितेशी निगडित असल्यामुळे, यासंदर्भातील नियमांचे उल्लंघन ही अतिशय गंभीर बाब आहे.

**०३.** ज्याअर्थी, शासन आदेश दि.०७.०१.२०२६ नुसार गठीत केलेल्या चौकशी समितीने दि.२८.०२.२०२६ नुसार सादर केलेल्या चौकशी अहवालावरुन उक्त उद्वाहन अनुज्ञप्ती देतांना सदर प्रकरणी गंभीर अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले आहे. श्री.उदय डांबे, विद्युत निरीक्षक, यांनी विद्युत निरीक्षक, उद्वाहन, मुंबई या पदावर कार्यरत असतांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक), १९७९ मधील नियम क्र. ३ (एक) नितांत सचोटी (दोन) कर्तव्यपरायणतेचा भंग केला आहे.

**०४.** ज्याअर्थी, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील (भाग-२) नियम ४ मध्ये निलंबन (१) (अ) अन्वये शासकीय कर्मचाऱ्याला त्याच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचे योजिले असेल किंवा अशी कार्यवाही प्रलंबित असेल अशा बाबतीत निलंबाधीन ठेवू शकेल.

**०५.** त्याअर्थी, आता, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील (भाग-२) नियम ४ मध्ये निलंबन (१) (अ) च्या तरतुदीनुसार, शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करुन त्यांना उक्त नियमाच्या नियम ४ च्या पोट-नियम (१) (अ) नुसार प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन याद्वारे, श्री.उदय डांबे, विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग, जळगाव यांना विद्युत निरीक्षक, उद्वाहन, मुंबई या पदावर दि.३१.०३.२०२१ ते दि.३०.०७.२०२५ या कालावधीत कार्यरत असतांना त्यांनी केलेल्या अनियमिततेबाबत त्यांना **या आदेशाच्या दिनांकापासून** सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निलंबित करीत आहे आणि पुढील आदेश काढले जाईपर्यंत ते निलंबित राहतील.

**०६.** पुढे असेही आदेश देण्यात येत आहेत की, हा आदेश अंमलात राहील तोपर्यंत श्री.उदय डांबे, विद्युत निरीक्षक, जळगाव यांचे मुख्यालय अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षक मंडळ, शिवदास ट्रेड सेंटर, पहिला मजला, प्लॉट नं.११, हॉल नं.०४, त्रिमुर्ती चौक, जवाहर कॉलनी,डॉ.हेडगेवार हॉस्पिटल रोड, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००५ हे राहील. श्री.उदय डांबे यांना सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे मुख्यालय सोडता येणार नाही.

**०७.** पुढे असेही आदेश देण्यात येत आहेत की, हे आदेश अस्तित्वात राहतील त्या कालावधीसाठी श्री.उदय डांबे, विद्युत निरीक्षक यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम,१९८१ च्या नियम ६८ (१) (ए) अन्वये निर्वाहभत्ता व त्यावरील इतर भत्ते देय राहतील.

**०८.** श्री.उदय डांबे, विद्युत निरीक्षक यांना निलंबन कालावधीत महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम-१६ मधील तरतूदीनुसार कोणतीही खाजगी नोकरी स्विकारता येणार नाही अथवा कोणताही व्यवसाय करता येणार नाही. जर, श्री.उदय डांबे यांनी खाजगी नोकरी स्विकारली अथवा काही व्यवसाय केला तर, गैरवर्तणूकीबाबत त्यांना दोषी समजण्यात येऊन, त्याप्रमाणे त्यांचेविरुद्ध कारवाई करण्यास ते पात्र होतील आणि अशा परिस्थितीत ते निर्वाहभत्ता मिळण्याचा हक्क गमावतील.

**०९.** सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०५०८१८०८१७३७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AVINASH RAJESH ATKAD

Digitally signed by AVINASH RAJESH ATKAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=F772EE0A28E62B88C18153A71C018DB8CA85BB88519F9C9732879CD03483D005, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7DFB83DE598E6DA39C6F3759E6943FB264003EB8BAFCBA24102A6D87367C3EA1, cn=AVINASH RAJESH ATKAD
Date: 2026.05.08 18:11:23 +05'30'

**( अविनाश रा. आतकड )**
**कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

श्री.उदय डांबे, विद्युत निरीक्षक, जळगाव. (**द्वारा-** मुख्य विद्युत निरीक्षक, प्रशासकीय इमारत, ३रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई.)

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मुख्य विद्युत निरीक्षक, प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदरील आदेश श्री.उदय डांबे, विद्युत निरीक्षक यांना खास दुतामार्फत बजावून, त्यांची दिनांकित पोच पावती शासनास कृपया **तात्काळ** सादर करावी.
४. सह सचिव (कार्यासन-११), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सह सचिव (ऊर्जा-१), उद्योग, ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षक मंडळ, छत्रपती संभाजीनगर.
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव.
९. निवडनस्ती (ऊर्जा-१).